## पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

## ईश्वर टी ॲण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव
सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी

प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३२८ वा • गुरुवार, ता. १२ जून २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## लायबेरियन जहाज बुडाल्याप्रकरणी केरळ पोलिसांची कारवाई



### जहाज मालक, मास्टर व 'क्रू'वर गुन्हा दाखल

**कोची । प्रतिनिधी**

केरळमधील कोचीच्या किनाऱ्यापासून काही अंतरावर समुद्रात बुडालेल्या लायबेरियन जहाजामुळे निर्माण झालेल्या पर्यावरणीय संकटप्रकरणी केरळ पोलिसांनी महत्त्वाची कारवाई केली आहे. एमएससी एल्सा ३ या सागरी इंधन वाहून नेणाऱ्या कंटेनर जहाजाच्या बुडीत अपघातात झालेल्या निष्काळजीपणाबद्दल जहाजाचे मालक, मास्टर व क्रू यांच्याविरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २४ मे रोजी घडलेल्या या घटनेत एमएससी एल्सा ३ हे जहाज कोची किनाऱ्यापासून सुमारे ३८ नॉटिकल मैल (सुमारे ७० किमी) अंतरावर समुद्रात बुडाले होते. जहाजामध्ये मोठ्या प्रमाणात साठवलेले ज्वलनशील सागरी इंधन समुद्रात गळल्यामुळे परिसरातील जैवविविधता आणि मच्छीमार समुदायाच्या उपजीविकेवर मोठा परिणाम झाला आहे.

केरळ पोलिसांनी भारतीय दंड विधान (BNS) च्या कलम २८२, २८५, २८६, २८७ आणि २८८ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या कलमांमध्ये विषारी, ज्वलनशील किंवा स्फोटक पदार्थांच्या हाताळणीतील निष्काळजीपणाला शिक्षेस पात्र ठरवले आहे. एफआयआरमध्ये नमूद केल्याप्रमाणे, ''ज्वलनशील सागरी इंधन वाहून नेणाऱ्या जहाजाची हाताळणी करताना जहाज मालक, मास्टर आणि क्रू यांनी अत्यंत निष्काळजीपणा दाखवला, ज्यामुळे जहाज बुडून सागरी इंधन समुद्रात मिसळले. याचा थेट परिणाम परिसरातील पर्यावरणावर व मच्छीमारांच्या उपजीविकेवर झाला. सागरी इंधन गळतीमुळे अलप्पुझा व इतर किनारपट्टी भागांतील मासेमारीच्या व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. स्थानिक मच्छीमारांच्या मते, यामुळे त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. समुद्रातील प्रदूषणामुळे मासळीचा संख्यात्मक व जैविक घट झाला असून अनेकांनी आपल्या होडी व जाळी बंद ठेवली आहे. या प्रकरणात सी. शामजी नावाच्या नागरिकाने अलप्पुझा जिल्ह्यात तक्रार दाखल केली होती, त्यावरून पोलिसांनी गुन्हा नोंदवला. सध्या सागरी प्रदूषणाची तपासणी व सागराचे निर्जंतुकीकरण यासाठी तांत्रिक पथक काम करत आहे. पर्यावरण विभागाकडून नुकसानीचा अहवाल मागवण्यात आला असून दोषींवर कडक कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.




## शाश्वत विकासाच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल- पवार

### भारतातील पहिली ग्रीन म्युनिसिपल बाँड लिस्टिंग

**मुंबई । प्रतिनिधी**

बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (BSE) येथे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ग्रीन म्युनिसिपल बाँडच्या लिस्टिंगचा भव्य उद्घाटन समारंभ पार पडला. या कार्यक्रमास राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. ही भारतातील पहिली ग्रीन म्युनिसिपल बाँड लिस्टिंग असून, पर्यावरणपूरक व शाश्वत शहरी विकासासाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हरित पायाभूत सुविधांच्या उभारणीत गुंतवणूक करू शकेल, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या वेळी अजित पवार म्हणाले, ''ही एक ऐतिहासिक घडी आहे. या उपक्रमामुळे राज्यातील इतर महानगरपालिकांनाही नवा आदर्श मिळेल. पर्यावरणाचा समतोल राखत आर्थिक विकास साधणे, ही काळाची गरज आहे.'' कार्यक्रमात बीएसईच्या घंटानादासह लिस्टिंगचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी संबंधित अधिकारी, लोकप्रतिनिधी व औद्योगिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यानिकेतन शैक्षणिक संकुलात नव्या वास्तूचे उद्घाटन



**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

विद्यानिकेतन शैक्षणिक संकुल निर्मित महाविद्यालयाच्या नवीन वास्तूचे उद्घाटन व स्व. ॲड. रावसाहेब शिंदे स्मृती पुरस्कार वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. संगणक आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात भरीव कार्य करणारे डॉ. विवेक सावंत यांना राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला खासदार निलेश लंके, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, डॉ. राजीव व डॉ. प्रेरणा शिंदे, मधुकर भावे, भगीरथ शिंदे, दादा कळमकर आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. सावंत यांनी उभारलेली महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (MKCL) ही संस्था लाखो विद्यार्थ्यांना संगणक साक्षरतेकडे घेऊन गेली. त्यांच्या प्रयत्नातून केवळ महाराष्ट्रात नव्हे, तर भारताबाहेरसुद्धा संगणक शिक्षणाच्या संधी निर्माण झाल्या. या योगदानाबद्दल त्यांचा आजचा सन्मान अत्यंत योग्य आणि प्रेरणादायी ठरला, असे मत शरद पवार यांनी व्यक्त केले. शरद पवार यांनी आपल्या भाषणात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) वापरातून शेतीमध्ये होत असलेल्या क्रांतीची माहिती दिली. AI च्या माध्यमातून ऊस पिकाचा कालावधी ९ महिन्यांवर आणणे, उत्पादनात ३०% वाढ आणि पाण्याचा वापर ३०% घटवणे हे यश मिळाल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमासाठी राज्य सरकारने ५०० कोटींची तरतूद केल्याचेही त्यांनी जाहीर केले. सुरुवातीच्या टप्प्यात १०,००० शेतकऱ्यांवर प्रायोगिक तत्त्वावर हे तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट आणि साखर कारखान्यांचे सहकार्य देखील घेतले जाईल. या कार्यक्रमात बोलताना पवारांनी अण्णासाहेब शिंदे आणि रावसाहेब शिंदे यांच्या कार्याची आठवण करून दिली. ICAR त्यांनी मधील योगदान, डाव्या विचारसरणीचे सामाजिक भान आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदान यांचे स्मरण करताना सांगितले की, ''ते आज असते तर त्यांच्या कार्याचे फलित पाहून निश्चितच आनंद व्यक्त केला असता.'' डॉ. राजीव आणि डॉ. प्रेरणा शिंदे यांच्या पुढाकारातून उभे राहिलेले विद्यानिकेतन शैक्षणिक संकुल हे केवळ एक शैक्षणिक केंद्र नसून विधायक कार्याच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल असल्याचे शरद पवार यांनी नमूद केले.

## प्रत्येक मतदारयादी ऑनलाइन करा- निवृत्त सनदी अधिकारी महेश झगडे

### जनतेचा विश्वास अबाधित ठेवण्यासाठी मागणी



**नाशिक । प्रतिनिधी**

निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि जनतेचा विश्वास अबाधित ठेवण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्राच्या मतदार याद्या सार्वजनिकपणे वेबसाइटवर उपलब्ध कराव्यात, अशी ठाम मागणी निवृत्त सनदी अधिकारी महेश झगडे यांनी केली. त्यांनी म्हटले की, मतदार नोंदणीसंबंधित कोणताही बदल, नावनोंदणी, वगळणे, स्थलांतर हे सर्व माहिती तात्काळ ऑनलाइन दिसणे आवश्यक आहे. यामुळे अनावश्यक वादविवादांना आणि गैरसमजांना पूर्णविराम देता येईल. महेश झगडे हे प्रशासनातील पारदर्शकतेसाठी ओळखले जात असून त्यांनी आपल्या निवृत्तीनंतरही विविध सार्वजनिक मुद्द्यांवर अभ्यासपूर्ण मते मांडली आहेत. त्यांनी सुचवलेली ही शिफारस निवडणूक आयोगासाठी मार्गदर्शक ठरू शकते, अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. सध्याच्या यंत्रणेत मतदार सूचीमध्ये बदलांची माहिती तातडीने उपलब्ध न होण्याने अनेक वेळा नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागते.

या पार्श्वभूमीवर झगडे यांच्या या मागणीला व्यापक पाठिंबा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मतदान प्रक्रियेत पारदर्शकता आणि सहभाग वाढविण्यासाठी ही मागणी निवडणूक आयोगाने गांभीर्याने विचारात घ्यावी, असे मत अनेक निवडणूक अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्तेही मांडत आहेत.



## शास्त्रीनगरच्या महिलांचा संताप; मैलामिश्रित पाण्यासह मनपावर मोर्चा

### आयुक्तांनी बाटलीत आणलेले पाणी प्यावे महिलांचे आवाहन

**अहमदनगर । समीर मन्यार**

केडगाव शास्त्रीनगर येथील महिलांचा संताप बुधवारी उसळला, जेव्हा परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या ड्रेनेज समस्येला कंटाळून त्यांनी थेट मैलामिश्रित पाण्याच्या बाटल्या हातात घेऊन अहिल्यानगर महापालिकेवर मोर्चा नेला.

प्रशासक तथा महापालिका आयुक्तांच्या अनुपस्थितीत महिलांनी त्यांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन करत आयुक्तांनी शास्त्रीनगरमध्ये येऊन आठवडा राहून दाखवा अशी थेट मागणी केली. परिसरातील नागरिकांच्या घरांसमोर मैलामिश्रित पाण्याचे साठे झाले असून, त्यामुळे दुर्गंधी आणि साथीचे आजार पसरले आहेत. अनेकवेळा निवेदने देऊनही प्रशासनाने केवळ पोकळ आश्वासने दिली असून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. पिण्याच्या पाण्यात सांडपाणी मिसळल्यामुळे पाणीदेखील अशुद्ध झाले आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते अनगत महानवर यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी हे आंदोलन छेडले. सहभागी महिलांनी आयुक्तांनी बाटलीत आणलेले पाणी प्यावे, व परिसरात आठवडा राहून नागरिकांची स्थिती अनुभवावी, अशी मागणी केली.

आंदोलनात पप्पू भाले, दत्तात्रय दळवी, शुभम गायकवाड, विलास गायकवाड, संगीता जपे, आशा बोरुडे, यमुना गायकवाड आदींसह शेकडो महिला व नागरिक सहभागी झाले होते. दरम्यान, उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी आंदोलकांशी संवाद साधताना अर्वाच्य भाषा वापरल्याचा आरोप करत आंदोलकांनी त्यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. मुंडे यांनी माफी मागावी, अन्यथा लढा अधिक तीव्र करण्यात येईल असा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

## शूर सैनिकांच्या बलिदानाचे स्मरण; नगरमध्ये शहीद स्मारकाचे भव्य अनावरण

### देशसेवेचा सन्मान! वीर जवानांना मानवंदना...शहीद स्मारक प्रेरणेचा स्तंभ






**अहमदनगर । प्रतिनिधी**

देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या जवानांच्या असामान्य शौर्याचे स्मरण व प्रेरणा जपणारे शहीद स्मारक नगरमध्ये सैनिक लॉन येथे मोठ्या श्रद्धा व सन्मानाने अनावरण करण्यात आले. ''हे स्मारक एक पवित्र स्थान ठरेल,'' असा भावनिक संदेश या वेळी मेजर जनरल विक्रम वर्मा यांनी दिला. या समारंभात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, ब्रिगेडियर सुनील कुमार, पद्मश्री पोपट पवार, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषद सीईओ आनंद भंडारी, रोटरी क्लबचे डॉ. प्रसन्न देवचक्के यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी मेजर जनरल वर्मा म्हणाले, देशाच्या रक्षणासाठी जवान सीमेवर आपले सर्वस्व अर्पण करतात. त्यांच्या बलिदानाचे स्मरण प्रत्येक भारतीयाच्या अंतःकरणात असले पाहिजे. महिलांचा सैन्यसेवेतील वाढता सहभाग, वसतिगृहातील विद्यार्थिनींना अधिकारी बनवण्याचे उद्दिष्ट, आणि सेवानिवृत्त जवानांनी समाजकार्याच्या माध्यमातून सेवा सुरू ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले. डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यातील ५१ सैनिकांनी देशासाठी बलिदान दिले असून, त्यांच्या सन्मानार्थ हे स्मारक उभारण्यात आले आहे. गतवर्षी ५ कोटींचा ध्वजदिन निधी संकलित झाला होता, तर यावर्षी आतापर्यंत ३.५ कोटी संकलन झाले आहे. सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या अडचणी सोडवण्यासाठी १६ ते ३० जूनदरम्यान विशेष पंधरवडा राबवला जाणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. ब्रिगेडियर सुनील कुमार यांनी नमूद केले की, शहीद स्मारक हे केवळ स्मरणस्थळ नसून, येणाऱ्या पिढ्यांना देशप्रेम, साहस आणि बलिदानाची शिकवण देणारे मार्गदर्शक केंद्र ठरेल.'' पद्मश्री पोपट पवार यांनी हिवरेबाजार येथे माजी सैनिक आणि प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन गावांना दत्तक घेण्याचा आदर्श उपक्रम राबवण्याची घोषणा केली. कार्यक्रमात मान्यवरांनी शहीद स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून वीर जवानांना आदरांजली वाहिली. सैन्यदलाच्या वतीने शहिदांना मानवंदना देण्यात आली. वीरमाता, वीरपत्नी व वीरपिता यांचा विशेष सन्मान करण्यात आला. स्मारकाच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्यांचा गौरवही झाला.प्रास्ताविक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सागर कोरडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल तर आभार चंद्रकांत शिंदे यांनी मानले. हा सोहळा केवळ स्मारक अनावरणाचा नव्हे, तर देशप्रेम, कृतज्ञता आणि प्रेरणेचा उत्सव ठरला. या स्मारकातून उद्याच्या पिढ्यांना देशासाठी झुंजणाऱ्या वीरांची आठवण आणि प्रेरणा लाभणार आहे.



# श्रीरामपुरकरच्या ८० वारकऱ्यांची सायकल दिंडी

## साडेतीन हजार सायकलपटुंचा सहभाग

**श्रीरामपुर। शफीक बागवान**

आषाढी वारी निमित्ताने २० जून ते २२ जून दरम्यान श्रीरामपूर ते श्रीक्षेत्र पंढरपूर सायकल वारीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती श्रीरामपूर सायकलिंग क्लबचे प्रमुख डॉ. संकेत मुंदडा यांनी दिली. सायकलिंग वारी यशस्वी करण्यासाठी त्याचाच भाग म्हणून सायकलिंगच्या सरावासाठी आतापर्यंत देवगड, सरलाबेट, नेवासा, संगमनेर, गणपती ताहराबाद, पुणतांबा, राहुरी कारखाना, लोणी, कोल्हार, गणेश खिंड, शिवनेरी किल्ला,पळशी ता.पारनेर,देवळाली प्रवरा, शिर्डी आदी ठिकाणच्या देवस्थानांना भेट दिली आहे. दर रविवारी साधारण १०० कि.मी. सायकल प्रवासाचा, सराव करण्यात येत आहे. जागतिक पर्यावरण दिनाच्या नमित्ताने आज संगमनेर येथील श्री गणपती मंदिरात जाऊन क्लबच्या सदस्यांनी पंढरपूर सायकल प्रवास सुखकर होण्यासाठी श्री गणेशाला साकडे घालण्यात आले तसेच श्रीरामपुर ते पंढरपूर सायकल वारी शुक्रवारी दि. २० जून रोजी पहाटे ५ वाजता शहरातील श्रीराम मंदिर चौकातून या सायकल वारी सोहळ्याचे शहरातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रस्थान होणार आहे. या वर्षी सायकल वारी चे द्वितीय वर्ष असून जवळपास ८० पेक्षा जास्त जणांनी सहभाग नोंदवला आहे. त्यामध्ये ६-७ महिलांचाही सहभाग आहे. दि. २० जून रोजी संध्यकाळी करमळा येथे मुक्काम आहे, तर दि. २१ जून रोजी टेंभुर्णी मार्गे पंढरपूर येथे पोहचणार आहे. व पंढरपूर येथे दी. २२ जून ला होणाऱ्या राज्यस्तरीय सायकल रिंगण सोहळ्यात भाग घेणार आहे. या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रातून सायकलस्वार पंढरपुरात एकत्र होणार आहे या मध्ये राज्यातिल विविध ८७ सायकलिंग क्लबच्या सायकलपटूंचे संमेलन व वारकऱ्यांप्रमाणे सायकलस्वारांचा रिंगण सोहळा २२ जूनला होणार आहे. यात राज्यभरातून जवळपास साडेतीन हजार सायकलपटू सहभागी होणार आहेत. यावेळी रॅली, पुरस्कार वितरण व अन्य कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या वर्षाच्या सायकल वारीच्या यशस्वीतेसाठी दविंदरसिंग धुप्पड, गणेश बनकर, अच्युत औताडे, विकास झगडे, नितीन देशमुख, हार्दिक जोशी, श्रवण सोमाणी, अभिमन्यू मांडण, श्रीकांत दहिमिवाल आदींसह श्रीरामपूर सायकलिंग कल्बचे सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत.



# डॉ. सी.व्ही. रामन परीक्षेत चव्हाण राज्यात द्वितीय तर शिर्के जिल्ह्यात तृतीय

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

बालवैज्ञानिकांमध्ये प्रायोगिक कौशल्य व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी जनसेवा सामाजिक,सांस्कृतिक,शैक्षणिक प्रतिष्ठान अहिल्यानगर संचलित डॉ.सी.व्ही.रामन बालवैज्ञानिक परीक्षेत शेवगाव येथील आबासाहेब काकडे माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. तेजस्विनी पांडुरंग चव्हाण हिने महाराष्ट्र राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे तर चि.स्वराज्य धर्मेंद्र शिर्के याने अहिल्यानगर जिल्ह्यात तृतीय क्रमांक पटकावला आहे. आबासाहेब काकडे विद्यालयात इ.६ वी ते ९ वी मधून ६६ विद्यार्थी या परीक्षेला प्रविष्ट झाले होते. विद्यालयाचा निकाल १००% लागला असून इ.६ वी मधून कु. आमले आराध्या निळकंठ हिने अनुक्रमे तालुक्यात चतुर्थ, चि.शिंदे वेदांत भाऊसाहेब ५ वा , इ.७ वी मधून कु. सानप समृद्धी संदीप हिने तालुक्यात द्वितीय, चि. दुसुंगे समर्थ गोरक्षनाथ याने तृतीय क्रमांक तर इ.८ वी मधून चि. गर्कळ अथर्व देविदास तालुक्यात तृतीय,चि. मुटकुळे साईराज कल्याण तालुक्यात चतुर्थ ,कु. देशमुख अनुजा नितीन तालुक्यात पाचवा तर इ.नववी मधून कु.श्रेया वसंत देशमुख हिने तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावला. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना विज्ञान विषय शिक्षिका रागिनी लबडे ,वैशाली धोंडे, शिवाजी कोल्हे, उपमुख्यध्यापिका पुष्पलता गरुड, वर्गशिक्षक रामदास पांढरे यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड.डॉ.विद्याधर काकडे,जि.प.सदस्या हर्षदा काकडे,संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मणराव बिटाळ, उपमुख्यकार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंह काकडे, शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख अशोक आहेर, प्राचार्य संपतराव दसपुते, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड,पर्यवेक्षक सुनील आव्हाड, लक्ष्मण गाडे व सर्व शिक्षक बंधू भगिनी तसेच पालकांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पाण्याचे एक आर्वतन तात्काळ सोडावे- कोल्हे

**कोपरगाव । प्रतिनिधी**



सध्या दारणा व गंगापूर धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामासाठी आणखी एक पाण्याचे आवर्तन तात्काळ सोडण्यात यावे, अशी आग्रही मागणी संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी नाशिक पाटबंधारे विभागाकडे केली आहे. बिपीन कोल्हे यांनी यासंदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे की, उन्हाळ हंगाम १ मार्च ते ३० जून या कालावधीत असतो. या कालावधीसाठी गोदावरी उजवा व डावा कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी नमुना क्रमांक ७ चे अर्ज दाखल करून पाण्याची मागणी केलेली असून ती अधिकृतरीत्या मंजूर देखील झाली आहे. सध्या कोपरगाव आणि परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी बारमाही ऊस लागवड केलेली असून या पिकास वेळेवर आणि सातत्याने पाण्याचा पुरवठा होणे अत्यावश्यक आहे. सध्या गोदावरी कालव्यामार्गे फक्त पिण्याच्या पाण्यासाठी आवर्तन सुरू करण्यात आले आहे, मात्र शेतीसाठी आवश्यक असलेले आवर्तन अद्याप देण्यात आलेले नाही. कोल्हे यांनी स्पष्ट केले की, धरणांमध्ये पाणीसाठा उपलब्ध असताना देखील शेतकऱ्यांना पाण्याविना त्यांच्या पिकांचे नुकसान सहन करावे लागणे ही शासन यंत्रणेची मोठी तांत्रिक चूक ठरेल. त्यामुळे गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामासाठी शेतीसाठीचे आणखी एक आवर्तन तातडीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने सोडण्यात यावे, अशी त्यांनी मागणी केली आहे.

# सरसकट कर्जमाफी घेणारच- ॲड. कॉ. सुभाष लांडे

## भाकपची २५ वी त्रैवार्षिक तालुका परिषद संपन्न

**पारनेर । प्रतिनिधी**

''सत्तेवर आल्यानंतर दिलेल्या आश्वासनांपासून पळ काढणाऱ्या महायुती सरकारला जागं करण्यासाठी सरसकट कर्जमाफी न मिळेपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही,'' अशी ठाम भूमिका भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव ॲड कॉ. सुभाष लांडे यांनी व्यक्त केली. पारनेर येथे पार पडलेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या २५ व्या त्रैवार्षिक तालुका परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कॉ. लांडे यांनी स्पष्ट केले की, महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी सर्व शेतकऱ्यांचे कर्ज माफ करून सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आता सत्तेत आल्यावर तेच आश्वासन पाळण्यात आलेले नाही. त्यामुळे किसान सभा शेतकऱ्यांकडून कर्जमाफीसाठी अर्ज भरून घेऊन मोर्चा काढून हे




अर्ज तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री यांच्याकडे सादर करणार आहे. परिषदेच्या पुढील सत्रात राजकीय, संघटनात्मक आणि आंदोलनात्मक अहवालावर चर्चा करण्यात आली. शेतकरी, मजूर, कामगार, विद्यार्थी, युवक आणि महिलांच्या प्रश्नांवर ठराव मंजूर करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्र सरकारचे जनविरोधी जनसुरक्षा विधेयक २०२४ मागे घ्यावे, शेतमालाला हमीभावासाठी (एमएसपी) कायदा लागू करावा, तसेच केंद्र सरकारने आणलेल्या चारही श्रम संहितांचा विरोध करण्यात आला. या आंदोलनांची तीव्र तयारी करत, येत्या ता. ९ जुलै २०२५ रोजी होणारा देशव्यापी संप यशस्वी करण्याचा ठरावही परिषदेने संमत केला. पक्षाच्या नव्याने निवडलेल्या ३५ सदस्यीय तालुका कौन्सिलमध्ये कॉ. संतोष खोडदे यांची पुन्हा तालुका सचिवपदी निवड करण्यात आली. कॉ. कैलास शेळके आणि कॉ. बबनराव रावडे यांची सहसचिवपदी नियुक्ती करण्यात आली. या परिषदेस जिल्हा सहसचिव सुधीर टोकेकर, शिवाजी करंजुळे, जयसिंग गायकवाड, बापू घुमटकर, अंकुश गायकवाड, चंद्रकांत चौधरी, हौशीराम पाटील, किरण खामकर, सुदाम गायकवाड, सुलाबाई आदमाने, रखमाबाई शेळके, मैनावती दिवेकर, निर्मला खोडदे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**परिषदेत किसान सभेच्या पारनेर तालुकाध्यक्षपदी सुभाष ठुबे, सचिवपदी संपतराव रावडे आणि उपाध्यक्षपदी बापू गायकवाड यांची निवड करण्यात आली. अध्यक्षस्थानी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष बबनराव सालके-पाटील होते.**

# किर्तन परंपरा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक समृद्धीचे द्योतक- रामगिरी महाराज



**पाथर्डी । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये किर्तन परंपरेचे महत्त्व अनन्यसाधारण असून किर्तन संस्था ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आधात्मिक क्षेत्रातील महत्त्वाचे केंद्र आहे. या परंपरेचा उगम थेट प्राचीन पुराणग्रंथात तसेच वैदिक काळात सापडतो.यावरून या माध्यमाची प्राचीनता व मौलिकता स्पष्ट होते.किर्तन परंपरा ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक समृद्धीचे द्योतक आहे असे प्रतिपादन येळेश्वर संस्थान येळी येथील मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांनी केले. येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयात पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त टाळकरी वृंदांच्या सन्मान सोहळा कार्यक्रम प्रसंगी रामगिरी महाराज बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनता दल प्रदेश सरचिटणीस भगवानराव बांगर तर व्यासपीठावर पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड,उपाध्यक्ष ॲड.सुरेशराव आव्हाड,गायनाचार्य कांताबापू देवढे,रवी महाराज भापकर,तांदळे महाराज, आप्पासाहेब मोरे,राधाकिसन सबलस,अमोल महाराज सोळसे,प्राचार्य डॉ.बबन चौरे,मुख्याध्यापक शरद मेढे,सुडके महाराज आदी मान्यवर उपस्थित होते. रामगिरी महाराज म्हणाले,किर्तनाद्वारे भक्तीचा अखंड प्रसार होत असून वारकरी पंथात तेराव्या शतकात सुरू झालेला हा किर्तनानंद अखंडपणे महाराष्ट्रभर विणेच्या झंकाराने आणि राम कृष्ण हरीच्या गजराने निनादत आहे. समाजप्रबोधनासाठी किर्तनासारखे सशक्त साधन इतर कोणतेही नसून भक्ती आणि ज्ञानाचा सुरेख संगम किर्तनातून प्रतीत होतो. किर्तनामध्ये किर्तनकाराचा जेवढा महत्त्वाचा वाटा आहे तेवढाच महत्त्वाचा वाटा टाळकऱ्यांचा आहे म्हणूनच स्व. बाबुजी आव्हाड यांनी साठ वर्षांपूर्वी सुरू केलेल्या पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या हीरक महोत्सवानिमित्त संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड यांनी टाळकऱ्यांचा केलेला सन्मान निश्चितच भूषणावह आहे असे ते शेवटी म्हणाले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष भगवानराव बांगर,अमोल महाराज सोळसे,कांताबापू देवढे,पत्रकार राजेंद्र देवढे यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी पाथर्डी शहर, हंडाळवाडी,तनपुरवाडी व परिसरातील ७५ टाळकरी वृंदांचा सन्मान विठ्ठल रुक्मिणीची आकर्षक मूर्ती देऊन करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.बबन चौरे,सूत्रसंचालन डॉ.अभिमन्यू ढोरमारे व प्रा.शेखर ससाने तर आभार डॉ.अशोक कानडे यांनी मांडले

**मोहोज देवढे या गावाची भूमी अतिशय उपजाऊ असल्याने, या मातीतील अनेक ग्रामस्थांनी गावाचे नांव मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले. ज्या काळात प्रसार माध्यमांचे प्रकार अतिशय कमी होते, त्या काळात कांताबापू देवढे यांना आकाशवाणीवर भजन गाण्याची संधी मिळाली होती. त्यामुळे, माझ्यासह सर्व ग्रामस्थांचा ऊर अभिमानाने भरून आला होता. चैतन्य देवढे या बालकलाकाराने या कलेला राष्ट्रीय पातळीवर नेऊन ठेवले. पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक उपाध्यक्ष स्वर्गीय आसराजी पाटील देवढे यांनीही त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला होता. स्वर्गीय भीमराव पाटील देवढे यांनी महाराष्ट्राच्या मोठ्या भागात पखवाज वादनाने नांव कमावले होते. स्वर्गीय डॉ. श्रीधर काटे यांनी शैक्षणिक असुविधांच्या काळात इंग्लंड येथे शिक्षण पूर्ण करत तत्कालीन अहमदनगर जिल्ह्यात आरोग्य सेवेचे मोठे कार्य केले. वैमानिक शिवाजी काटे यांनी वेगळ्या क्षेत्रात कार्य करताना गावाचे नांव आसमंतात पोहोचवले. उमाशंकर देवढे यांनी इंग्लंड येथील विद्यापीठात व्याख्यान देऊन गावाचे नांव सातासमुद्रापार नेऊन ठेवले. ज्या महाविद्यालयात मी शिक्षण घेतले त्याच महाविद्यालयात कांताबापू देवढे या भूमिपुत्राचा सन्मान होणे हे आमच्या गावासाठी भूषणास्पद आहे.**

**राजेंद्र देवढे** । विशेष प्रतिनिधी, रयत समाचार



# संत एकनाथ महाराज चांदीच्या रथासाठी देणगी

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शांतीब्रम्ह श्री संत एकनाथ महाराज, पैठण यांच्या चांदीच्या रथासाठी गदेवाडी (ता. शेवगाव) येथील ग्रामस्थांनी एकत्र येत श्रद्धेने ₹ ५५,५५५/- इतकी रोख रक्कम देणगी स्वरूपात अर्पण केली.

ही देणगी हभप योगेश महाराज गोसावी (पालखी वाले) यांच्याकडे भक्तिभावाने सुपूर्त करण्यात आली. ग्रामस्थांनी या कार्यासाठी एकजुटीने निधी संकलित केला असून, एकनाथ महाराजांवरील श्रद्धा आणि भक्ती या मागील प्रेरणा असल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले. या वेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नानासाहेब मडके, केदारेश्वर साखर कारखान्याचे संचालक बापुराव घोडके, आप्पासाहेब मडके, रामभाऊ मडके, राजाभाऊ कुलकर्णी, रामनाथ लेंडाळ, हभप मिनाताई महाराज मडके, सोमनाथ मडके, नंदसर फाटे, अरुण मडके, माऊली साखरे यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी बोलताना हभप योगेश महाराज गोसावी म्हणाले, ''ही देणगी म्हणजे गदेवाडी ग्रामस्थांचा संत एकनाथ महाराजांवरील निष्ठेचा आणि भक्तीचा प्रतीक आहे. समाजाने अशा प्रकारच्या एकत्रित प्रयत्नातून आध्यात्मिक वारसा जपणे हीच खरी सेवा आहे.''

# पोलीस पाटील सयाराम बानकर यांची १३ जून रोजी आकाशवाणीवर मुलाखत

**नेवासा । विजय खंडागळे**



शनिशिंगणापूर येथील पोलीस पाटील ॲड. सयाराम तुकाराम बानकर यांची मुलाखत अहिल्यानगर आकाशवाणी केंद्रावरून ता. १३ जून २०२५ रोजी प्रसारित होणार आहे. 'लोकजागर' या कार्यक्रमांतर्गत सादर होणारी ही मुलाखत श्री. सुदाम बटुळे यांनी घेतली आहे. राज्य शासनाच्या वतीने नुकताच ॲड. बानकर यांना पोलीस पाटील सेवा पुरस्कार जाहीर करण्यात आला. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने राज्यपालांच्या वतीने, जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर त्यांची आकाशवाणीवरील ही मुलाखत विशेष महत्त्वाची आहे. मुलाखत १३ जून रोजी सकाळी ८:४० वाजता प्रसारित होणार असून, संध्याकाळी ८:१५ वाजता तिचे पुनःप्रसारण होणार आहे. ॲड. सयाराम बानकर हे पोलीस पाटील पदाच्या माध्यमातून केवळ गावातील कायदा-सुव्यवस्थाच नाही तर सामाजिक, कायदेशीर आणि जनजागृतीविषयक कार्यात सातत्याने सक्रीय राहिले आहेत. पोलीस पाटलांच्या विविध अडचणी, अधिकार आणि सेवा सुधारणा यासाठी ते सातत्याने शासन दरबारी आवाज उठवत असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन शासनाने त्यांना सन्मानित केले आहे.



माध्यमिक विद्यालय निंबळक येथील नूतन मुख्याध्यापिका संगिता जाजगे/आडसुळ यांचा सत्कार करताना डॉ. दिलीप पवार, पत्रकार संदीप बांगर, बाळासाहेब कोतकर, मावळते मुख्याध्यापक व्हि. एम. मगर, नजीर शेख, अरुण दळवी, दत्तात्रय मुठे, दत्ता घोलप, विशाल कोतकर आदी.

(छायाचित्र- एक्सप्रेस फोटो)

# पत्नीपीडित पुरुषांनाही संरक्षण मिळावे

औरंगाबादेतील वाळूंज भागातील पत्नीपीडित पुरुषांच्या आश्रमात काही पत्नीपीडित पुरुषांनी वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी पिंपळपूजन करून पिंपळपौर्णिमा साजरी केली. हे पुरुष दरवर्षी पिंपळपौर्णिमा साजरी करतात. आमच्या बायकांनी आम्हाला इतका त्रास दिला आहे की आम्ही त्यांच्यासोबत सात जन्मच काय सात सेकंदही संसार करू शकत नाही म्हणूनच आम्हाला अशा प्रकारच्या बायका देण्यापेक्षा कायमस्वरूपी मुंजा ठेव अशी प्रार्थना ते यम आणि मुंजाला करतात. हा प्रकार काहीसा विचित्र वाटत असला तरी खरा आहे. पुरुषही कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरतात यावर अजूनही अनेकांचा विश्वास बसत नाही याला कारण आहे आपली पुरुष प्रधान संस्कृती. पुरुषच महिलांवर अत्याचार करतो, त्यांचा मानसिक छळ करतो हेच आजवर आपण पाहत आलो आहोत पण आता काळ बदलला आहे. पुरुषही महिलांच्या अत्याचाराला बळी पडत आहे. आज कितीतरी पुरुष महिलांचा मानसिक अत्याचार सहन करत आहेत. पत्नी आपल्यावर अत्याचार करते आपला मानसिक छळ करते हे जर समाजात माहीत झाले तर आपलीच नाचक्की होईल या भीतीने अनेक पुरुष तो अत्याचार मुकाट्याने सहन करतात. ज्यांना हा अत्याचार सहन होत नाही ते आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात.



काही महिन्यांपूर्वी बंगळुरू मध्ये एका कंपनीत अभियंता असलेल्या ३४ वर्षीय अतुल सुभाष या तरुणाने पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने आपल्यावरील आपबिती ९० मिनिटांचा व्हिडिओ काढून तसेच ४० पाणी सुसाईड नोट लिहून सांगितली. या तरुणाला त्याच्या पत्नी आणि सासरच्यांनी हुंडाबळीच्या चुकीच्या आरोपाखाली तरुंगामध्ये पाठवले होते. काहीही चूक नसताना या तरुणाला तुरुंगात जावे लागले. न्यायालयात तो स्वतःचं निर्दोषत्व सिद्ध करू शकला नाही. समाजात त्याची बदनामी झाली त्यामुळे आलेल्या नैराश्यातून त्याने आत्महत्या केली. अर्थात अशी आत्महत्या करणारा अतुल सुभाष हा पहिला तरुण नाही याआधीही अनेक तरुणांनी पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्या आहेत. आताही काही दिवसांपूर्वी पुणे जिल्ह्यातील उरुळी येथे एका तरुणाने याच कारणाने आत्महत्या केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचनात आली. महिलेचा पती व त्याच्या कुटुंबियांकडून होणारा छळ रोखण्यासाठी ४९८ ( अ ) हा कायदा करण्यात आला. महिलांना संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या कायद्याचा अलीकडे मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होऊ लागला आहे. या माध्यमातून पती आणि सासरच्या लोकांविरुद्ध वैयक्तिक सुड उगवला जात आहे. महिलांनी त्यांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याचा अशाप्रकारे दुरुपयोग करू नये अशी टिप्पणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने देखील केली आहे. तरीही या कायद्याचा दुरुपयोग कमी होत नाही. पत्नीने पती विरुद्ध तक्रार दिली तर त्याची तातडीने दखल घेतली जाते. पत्नीवर अन्याय करणाऱ्या पतीला तात्काळ अटक केली जाते पण पतीला पत्नी विरुद्ध कारवाई करायची असेल, तर आपल्या देशात कौटुंबिक हिंसाचार अधिनियमना सारखा कायदा उपलब्ध नाही. सध्या असलेला कौटुंबिक अधिनियम संरक्षण कायदा पुरुषांना संरक्षण देत नाही. महिलांप्रमाणेच पत्नी पीडित पुरुषांनाही संरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी सरकारने कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कायद्यात दुरुस्ती करून पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण द्यावे.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# निखळ मनोरंजनाची मेजवानी
# ऑल इज वेल २७ जूनला चित्रपटगृहात

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

मैत्रीसाठी काहीही करायला तयार असणाऱ्या तीन मित्रांच्या आयुष्यात अशा घटना घडतात की त्यांच्या आयुष्यात खळबळ उडते. मात्र खूब जमेगा रंग, जब मिल बैठेंगे तीन यार संग असं म्हणत जीवन जगणाऱ्या प्रियदर्शन जाधव, अभिनय बेर्डे आणि रोहित हळदीकर या तीन मित्रांची अनोखी दुनियादारी ऑल इज वेल चित्रपटात पहायला मिळणार आहे. प्रेक्षकांच्या डोक्याला कसल्याही प्रकारचा ताप न देता केवळ निखळ मनोरंजनाच्या हेतूने ऑल इज वेल ची निर्मिती करण्यात आली आहे. अशी माहिती चित्रपटाचे दिग्दर्शक योगेश जाधव यांनी आज बुधवारी बेळगावात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना दिली. या चित्रपटा संदर्भात अधिक माहिती देताना योगेश जाधव पुढे म्हणाले, वाणीश्री फिल्म प्रॉडक्शन्सचा हा पहिलाच चित्रपट आहे. ऑल इज वेल या मनोरंजन आणि मस्तीने भरलेल्या मराठी चित्रपटात अमर, अकबर आणि अँथनी नावाच्या तीन मित्रांच्या मैत्रीची धमाल गोष्ट पहायला मिळणार आहे. पोटापाण्याच्या शोधात मुंबईत आलेल्या अमर, अकबर आणि अँथनी या तिघांच्या आयुष्यात एका



अनपेक्षित घटनेने कशी खळबळ उडते? याची धमाल गोष्ट ऑल इज वेल या चित्रपटातून पहायला मिळणार आहे. ही उलथापालथ निस्तरताना त्यांची मैत्री कशी खुलते, हे मजेशीर पद्धतीने सांगण्याचा प्रयत्न या चित्रपटामधून केला आहे. मनोरंजन आणि मस्तीचे जबरदस्त पॅकेज असलेल्या ऑल इज वेल चित्रपटाचे दिग्दर्शन योगेश जाधव तर लेखन प्रियदर्शन जाधव यांचे आहे. या चित्रपटाचे निर्माते अमोद मुचंडीकर, वाणी हालप्पनवर आहेत. सहनिर्माते मल्लेश सोमनाथ मरुचे, विनायक पट्टणशेट्टी आहेत. प्रियदर्शन जाधव, अभिनय बेर्डे, रोहित हळदीकर हे जबरदस्त त्रिकुट ऑल इज वेल या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच एकत्र आले असून तिघांसोबत या चित्रपटात अभिजीत चव्हाण, नक्षत्रा मेढेकर, सायली फाटक, माधव वझे, अजय जाधव, अमायरा गोस्वामी, दिशा काटकर आदि कलाकारांच्या भूमिका आहेत. त्याचबरोबर सुप्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांची या चित्रपटातील भूमिका सरप्राईजिंग कॅरेक्टर असणार आहे. चित्रपटाला चित्रपट महामंडळाने चांगले सहकार्य केले. असेही जाधव यांनी यावेळी स्पष्ट केले. चित्रपटाचे निर्माते अमोद मुचंडीकर आणि वाणी हलप्पणावर आपल्या या पहिल्या चित्रपट निर्मिती बाबत बोलताना म्हणाले, ऑल इज वेल चित्रपट संपूर्ण कुटुंबासाठी निखळ मनोरंजनाची मेजवानी असेल. मायबाप प्रेक्षकांनी या चित्रपटाला उदंड प्रतिसाद दर्शवावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. चित्रपटाचे कार्यकारी निर्माते संजय ठुबे आहेत. पटकथा, संवाद प्रियदर्शन जाधव यांनी लिहिले आहेत. युवा पिढीला भुरळ घालणारे, संगीतकार चिनार-महेश, अर्जुन जन्या यांचे श्रवणीय संगीत चित्रपटाचे आकर्षण आहे. चित्रपट छायाचित्रकारणात विश्वविक्रम करणारे मयुरेश जोशी यांनी चित्रपटाचे छायांकन केले आहे तर संकलन अथश्री ठुबे यांचे आहे. नृत्यदिग्दर्शक राजेश बिडवे तर साहसदृश्ये अजय ठाकूर पठाणीया यांची आहेत. वेशभूषा कीर्ती जंगम तर रंगभूषा अतुल शिधये यांनी केली आहे.

गीतकार मंदार चोळकर आहेत. गायक रोहित राऊत, गायिका अपेक्षा दांडेकर यांनी ऑल इज वेल चित्रपटातील गाणी गायली आहेत.पुणे, मुंबई अलिबाग येथे चित्रपटाचे छायांकन झाले आहे.बेळगाव सह महाराष्ट्रात, २७ जूनला ऑल इज वेल म्हणत चित्रपटगृहात धुडगूस घालायला सज्ज होत आहेत. या पत्रकार परिषदेला चित्रपटाचे निर्माते सहनिर्माते, छायाचित्रकार निर्मिती पर्यवेक्षक व अन्य सदस्य उपस्थित होते.

## शाळा, कॉलेजच्या मॅनेजमेंट कोट्यातून आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा-शिवसेनेची मागणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शिक्षणाच्या मूलभूत हक्कासाठी पुढाकार घेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनामध्ये मागणी करण्यात आली की, शाळा व महाविद्यालयांतील मॅनेजमेंट कोट्यातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा, जेणेकरून कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही. यासंदर्भात युवासेना युवा अधिकारी आनंद राठोड, कामगार सेना व शहरप्रमुख गौरव ढोणे आणि अभिजीत पतंगे यांनी माहिती देताना सांगितले की, सध्या शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया सुरू असून अनेक गरजू विद्यार्थ्यांना डोनेशन व महागड्या फीमुळे प्रवेश घेणे शक्य होत नाही. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांसाठी मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश खुले ठेवावेत, तसेच गरजूंना फी माफ करून शैक्षणिक संधी मिळावी. शाळा व कॉलेज व्यवस्थापनांनी डोनेशन किंवा फीच्या कारणास्तव कोणालाही प्रवेश नाकारू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच अशा प्रकारची नकारात्मक भूमिका घेणाऱ्या शिक्षणसंस्थांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

## गितांजली मडके ठरली महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ 'राज्यस्तरीय सर्वोत्तम विद्यार्थीनी'



**शेवगाव । लक्ष्मण मडके**


महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकचा २७ वा वर्धापन दिन ता. १० जून २०२५ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने बी.ए.एम.एस. (चतुर्थ वर्ष) अभ्यासक्रमातील राज्यस्तरीय ''उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार २०२५'' प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या आयुर्वेद महाविद्यालय, शेवगावच्या विद्यार्थिनी गितांजली अप्पासाहेब मडके हिला प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार विद्यापीठाच्या वर्धापन दिन समारंभात मा. खासदार डॉ. अजित एम. गोपछडे (सदस्य, राज्यसभा), ले. जनरल राजीव कानिटकर (PVSM, AVSM, VSM, SM), मा. डॉ. विकी मोहनलाल रुघवणी (प्रशासक, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई) यांच्या प्रमुख उपस्थितीत, कार्यक्रमाच्या अध्यक्ष ले. जनरल डॉ. माधुरी कानिटकर (कुलगुरू, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक), प्रो. डॉ. मिलिंद निकुंभ (प्रतिकुलगुरू) आणि डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाल (कुलसचिव) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी गितांजलीला प्रेरणादायी मार्गदर्शन करणाऱ्या डॉ. गीतांजली कार्ले (प्रमुख, रिसर्च डिपार्टमेंट, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ) देखील उपस्थित होत्या. ''ही माझी विद्यार्थिनी असल्याचा मला सार्थ अभिमान वाटतो,'' असे सांगून त्यांनी गितांजलीचे विशेष कौतुक केले. या यशाने प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या आयुर्वेद महाविद्यालय, शेवगावच्या नावलौकिकात भर पडली असून, महाविद्यालयाचे संचालक पंजाबराव आहेर , प्राचार्य डॉ. संतोष पवळे, अकॅडेमिक इन्चार्ज डॉ. रेणुका सूर्यवंशी, चतुर्थ वर्ष समन्वयक डॉ. सुमेध वासनिक, तसेच सर्व बी.ए.एम. एस. गुरुजन यांनी गितांजलीचे अभिनंदन करत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच गदेवाडी ग्रामस्थांच्यावतीने देखील गितांजलीचे मनापासून अभिनंदन करून तिच्या यशाचा गौरव करण्यात आला.

गितांजलीने यशाचे श्रेय आपल्या आई-वडील, भाऊ, कुटुंबीय, संपूर्ण गाव, शाळेपासून कॉलेजपर्यंतच्या सर्व शिक्षक वृंद, सहकारी सीनियर्स आणि बॅचमेट्स यांना दिले. तिने भावना व्यक्त करताना सांगितले, ''जे एक स्वप्न मी पाहिलं होतं कुलगुरू ले. जनरल माधुरी कानिटकर मॅडम यांच्याकडून बक्षीस स्वीकारण्याचं ते आज प्रत्यक्षात साकार झालं.

# गेल्या वर्षीचीच गोष्ट, दिवस आजचाच : वटपौर्णिमा

**हॅपी वटपौर्णिमा...**

**हा खरा नवऱ्याला दिलेला ऑक्सिजन... तोडलेल्या फांदीला दोरा गुंडाळण्यात काय अर्थ? पुरुष मानसिकदृष्ट्या नाजूक असतात त्यांना मानसिक उभारी बायका देऊ शकतात. म्हणूनच, बायकांनी वडाला फेऱ्या मारायच्या, की सतत समजूतदारपणे संसार सावरायचा हे ठरवावं. ''बायको वडाला फेऱ्या मारते... पण आयुष्याला जो खरा ऑक्सिजन देते, तो न बोलता तिच्या वागण्यातून!**



**रविंद्र शंकर पाटील,**
मुंबई, ८९२८४९०२६०

**कथा-ऑक्सिजन**

मेघा दरवर्षी हा सण अत्यंत श्रद्धेनं पाळते. आजही सकाळपासून वटपौर्णिमेचे शुभेच्छांचे मेसेज व्हॉट्सअ‍ॅपवर यायला लागले... मी (गालातल्या गालात हसत): ''आजही वटपौर्णिमा... म्हणजे, तिचा उपवास ठरलेला!'' तसं आमचं सगळं सुरळीत सुरू होतं माझा चांगला जॉब, तिचाही, छानशी सोसायटी, प्रशस्त फ्लॅट, आणि एक दुचाकी ज्यावरून मी रोज तिला स्टेशनवर सोडतो आणि परत आणतो. सगळ्यात गोड गोष्ट म्हणजे आमची लेक कस्तुरी. ती आता दीड वर्षांची. त्यामुळेमेघा पुन्हा नोकरीवर रुजू झाली आहे, कस्तुरीला तिची आई सांभाळते अगदी आपुलकीनं. म्हणून आम्ही दोघंही निर्धास्त. नेहमीप्रमाणे त्या दिवशीही मेघाला स्टेशनवर सोडलं आणि मी कंपनीकडे वळलो. सिक्युरिटी (थोडा घाईत): ''सर, मॅनेजर साहेबांनी ताबडतोब बोलावलंय.'' मी (थोडासा अस्वस्थ होत): ''असं अचानक? बरं, जातो लगेच.'' भेट झाली. काही बोलणी झाली. आणि... थेट घरी परत. कारण, कंपनीनं मला घरी बसवलं होतं. सगळं क्लिअर केलं, वस्तू परत दिल्या, थरथरत्या हातांनी पीएफचा चेक घेतला आणि शेवटचा 'रामराम' ठोकला. दार उघडलं. घर सुट्टीसारखं वाटलं. कस्तुरी (हसत धावत आली): ''बाबा!'' मी तिच्या चेहऱ्याकडे पाहिलं... आणि डोळे भरून आले. त्या हसऱ्या चेहऱ्यावरचं हसू कायम राहावं यासाठी आतून हादरलो होतो. मेघाला फोन लावला. मी (धीरगंभीर आवाजात): ''जशी आहेस तशीच घरी ये.'' ती विचार न करता धावत आली. दार उघडलं आणि मला पाहून तिच्या जिवात जीव आला. मी (तडक म्हणालो): माझी नोकरी गेली. ती शांतपणे आत आली. किचनकडे वळली. पाणी प्यायली, मलाही पाणी दिलं. म्हणाली ''जाऊ दे ना... दुसरी मिळेल की नोकरी! तोवर माझा पगार आहे ना. तुझ्या कंपनीचं बॅडलक!'' मी स्तब्ध झालो. तिच्या डोळ्यांत माया, ठामपणा आणि अव्यक्त धीर स्पष्ट दिसत होता. पण मनात विचारांचे काहूर कस्तुरीचं शिक्षण, घराचे हप्ते, लाईट बिल, मेंटेनन्स... हे सगळं कसं निभावणार? मी एव्हाना नोटा संपलेलं एटीएम झालोय! ह्याची मला जाणीव झाली होती. पण ती दररोज मला ऑक्सिजन सिलेंडरसारखी उभारी देत होती. तिला सोडून आलो की, मी कस्तुरीजवळ थांबत असे. सासूबाईंनाही घरकामात आराम मिळायचा. मी घरात राहून नोकरी डॉट कॉमवर रोज बायोडेटा टाकत राहायचो. उत्तर मात्र कुठूनच नसायचं. मित्रांकडून सहकार्य मिळत होतं, पण तिनं आधीच ठाम सांगितलं होतं ''सल्ला घ्या, पण कोणाकडून पैसे घ्यायचे नाहीत.'' मी सर्वांना कॉल करून जॉबबद्दल सांगितलं. सर्वजण खरंच प्रयत्न करत होते. पण शेजारी मात्र टोमणे मारायचे. शेजारी (खोटं हसत): ''जॉब गेलाय वाटतं...'' मी वैतागायचो. पण ती पुन्हा समोर यायची. ''लोकांना तुझं घरी असणं त्यांच्या स्वतःच्या अपयशाचं समाधान वाटतं. पळू नकोस. सामोरा जा!'' मी सांगू लागलो ''हो, जॉब गेलाय. नवीन शोधतोय. मिळेलच!'' चार महिने झाले. कस्तुरी आणि मेघा दोघींनी मला सावरलं. मी प्रयत्न सोडले नाहीत. एक दिवस माझा मित्र दिन्या घरी आला. दिन्या: ''मुलाचा अकाउंट्स अडलाय. शिकवशील का? तू सध्या घरीच असतोस ना...'' मी (मनात): ''हेच वाक्य मी हजार वेळा ऐकलंय!'' मी सटकलो, ''नाही जमणार!'' संध्याकाळी मेघा आली. तिला सगळं सांगितलं. मेघा (हसून): ''नेहमी लोकांच्या बोलण्याचा चांगला अर्थ घ्या. कॉलेजला टॉपर होतास ना तू? त्याच्या मुलाच्या जागी आपली कस्तुरी असती, तरी असंच उत्तर दिलं असतं का? इगो बाजूला ठेव. त्याचं समाधान तुझ्या दुःखावर उपाय ठरेल.'' तिचं सांगणं मला पटलं. मी दिन्याच्या मुलाला शिकवलं. तो पास झाला. पुढच्या सेमिस्टरला तोच पंधरा-वीस मुलांना घेऊन आला. घरात तीन बॅचेस सुरू झाल्या. दिवस पुरत नव्हता. मेघाने माझ्या निस्तेज शरीरामध्ये आत्मविश्वासाचा ऑक्सिजन भरला आणि आमची गाडी पुन्हा रुळावर आली. मी ठरवलं ''कितीही खडकाळ रस्ता असो, आता मी गाडी रेटतच राहणार!'' एक दिवस सहज मेल चेक केला. दहा महिन्यांपूर्वी पाठवलेल्या सीव्हीला रिप्लाय आलेला! मी लॅपटॉप बंद केला. (हसत स्वतःशीच) ''नाही... आता नको. धरली वाट सोडायची नाही!'' आज वटपौर्णिमा. तिथीनुसार एक वर्ष पूर्ण. माझ्या बॅड पॅचचा वाढदिवस. व्हॉट्सअ‍ॅपवर मेसेज यायला लागले. वटपौर्णिमा, मेघा आणि उपवास हे कॉम्बिनेशन आठवलं. ठरवलं आज तिच्यासाठी मी उपवास करणार. ती प्रेमळ, समजूतदार, न बोलता आयुष्याला अर्थ देणारी... ती कामावर निघायच्या गडबडीत होती. तितक्यात तिचा फोन वाजला. तयार होताहोताच ती फोनवर बोलत होती आणि तिच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलू लागले. ती फोन कट करून माझ्याजवळ आली. (हसत म्हणाली) ''मला प्रमोशन मिळालंय! आता मी स्पेशालिस्ट नर्स ऑफिसर झाले!'' मी (गालातल्या गालात हसून): अभिनंदन मेघु...! उपवासाची गोड सुरुवात झाली!



## अजित पवार यांच्या हस्ते श्याम दौंडकर लिखित धडपड भाग-३ पुस्तकाचे प्रकाशन

**पुणे । प्रतिनिधी**

ज्येष्ठ पत्रकार श्याम दौंडकर लिखित धडपड भाग-३ या पुस्तकाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते जिल्हा परिषद सभागृहात आयोजित पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात करण्यात आले. पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाला आमदार बापूसाहेब पठारे, आमदार शंकर मांडेकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष जालिंदर कामठे आदी मान्यवर उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार यावेळी म्हणाले, धडपड भाग तीन या पुस्तकाचे लेखक श्याम दौंडकर यांची एक रिक्षा चालकापासून ते जिल्ह्यातल्या पत्रकारितेपर्यंतची वाटचाल नक्कीच खडतर होती. पत्रकार म्हणून त्यांनी अनेक वर्ष जिल्हा परिषद बीट सांभाळले असून त्यामुळे त्यांचा संपर्क वाढला, अनेक क्षेत्रातील लोकांशी त्यांचा संपर्क आला, जिल्ह्याचे अनेक प्रश्न त्यांनी आपल्या लेखणीतून समाजासमोर मांडले, ग्रामीण भागातील समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. ग्रामीण भागाची जाण असलेले पत्रकार म्हणून श्री. दौंडकर यांच्याकडे बघितले जाते. पुस्तक लिहीत असताना त्यांनी कोणतेही बंधन स्वतःवर घातले नाही, असे ते म्हणाले. धडपड भाग-३ या पुस्तकात दिल्लीपासून ते गल्लीपर्यंतच्या गाथा त्यांनी सर्वांच्या समोर ठेवण्याचा, उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. अत्यंत गरिबीतून ते पुढे आले असून त्यांनी स्वतःच्या हिंमतीवर कष्टाच्या व संघर्षाच्या जोरावर पत्रकारितेसारख्या बुद्धिवंतांच्या क्षेत्रात स्वतःचे आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे. श्री. दौंडकर यांनी समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्या लेखणीचा वापर केला असून त्यातून त्यांनी लोकांचे प्रेम आदर सन्मान मिळविला आहे. पुस्तक लिखाणाबद्दल त्यांना जिल्ह्याच्या जनतेच्या वतीने शुभेच्छा देऊन पवार यांनी पुस्तकाच्या प्रकाशकांचे सुद्धा अभिनंदन केले. उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते कार्यक्रमाच्या शेवटी धडपड भाग-३ पुस्तक देऊन मान्यवरांचा व महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत विशेष यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. राजेंद्र खांदवे पाटील यांनी आभार व्यक्त केले.